ePaper

| वर्ष - 8 | अंक - 359 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 7 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## एकाच पदासाठी शिंदे आणि फडणवीस यांच्याकडून दोन नियुक्त्या



### आतील पानांत

- गिल-सिराजची योजना काय होती?
- गोलंदाजाना ताजेतवाणे का ठेवावे?
- आणखी टॅरिफ लावण्याची धमकी!
- २५ टक्केच्या आदेशावर ट्रम्प यांची स्वाक्षरी

**25 टक्के अतिरिक्त कर लादला** भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेलाची खरेदी सुरु ठेवल्याचा बदला !

# ट्रम्प यांचा भारताविरुद्ध सूडाग्नी!

## डोनाल्ड ट्रम्प यांनी उगवला भारताचा सूड : अतिरिक्त करामुळे भारताची निर्यात घटण्याची शक्यता

| न्यूयॉर्क / नवी दिल्ली
| वृत्तसंस्था | महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला पुन्हा दणका दिला आहे. अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली आहे. भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी सुरूच ठेवली असल्याचा बदला म्हणून ट्रम्प यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे. याला आता भारत कसे प्रत्युत्तर देतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**



### अमेरिकेची घोषणा, भारत अडचणीत

डोनाल्ड ट्रम्प यांनी गेले दोन दिवस धमक्या दिल्याप्रमाणे पंचवीस टक्के अतिरिक्त कर वाढवून भारताला पुन्हा दणका दिला आहे. अमेरिकेने हा निर्णय घेताना म्हटले आहे की, भारताने रशियन तेलाची सतत खरेदी केल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. याआधी अमेरिकेने भारतावर पंचवीस टक्के टॅरिफ लावला होता. त्यामुळे आता अमेरिकेचा एकूण कर पन्नास टक्के झाला आहे. ही भारतासाठी चिंतेची बाब आहे.

### अतिरिक्त कर 21 दिवसांत लागू

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेला अतिरिक्त कर २१ दिवसांच्या आत लागू होणार आहे. म्हणजेच दि. २७ ऑगस्ट २०२५ पासून हा कर लागू होणार आहे. मात्र, या तारखेपूर्वी भारतातून बाहेर पडलेल्या वस्तू दि. १७ सप्टेंबर २०२५ पूर्वी अमेरिकेत पोहोचल्या तर त्या वस्तूंवर हा कर आकारला जाणार नाही.

### काही वस्तूंवर सूट मिळण्याची शक्यता

विशेष म्हणजे हा कर इतर सर्व शुल्क आणि करांव्यतिरिक्त असणार आहे. मात्र, काही विशेष प्रकरणांमध्ये यात सूट दिली जाण्याची शक्यता आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी २४ तासांपूर्वीच भारतावर कर वाढवण्याची धमकी दिली होती. एका मुलाखतीत ट्रम्प म्हणाले होते की, जर भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवली, तर कर आणखी वाढवला जाईल. आता ट्रम्प औषध आयातीवरील कर २५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची शक्यता आहे. जो आतापर्यंतचा सर्वात मोठा कर असू शकतो, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

### आधी लावला होता 25 टक्के कर...

या आधी अमेरिकेने दि. २९ जुलै रोजी भारतावर २५ टक्के कर लावल्याची घोषणा केली होती. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिकेतील संबंध तितकेसे चांगले नाहीत, असेही विधान केले होते. अमेरिकेच्या या निर्णयामुळे भारताच्या निर्यातीवर परिणाम होणार आहे. आता आणखी कर वाढल्याने भारताची अर्थव्यवस्था संकटात सापडण्याची शक्यता आहे.

### रशियन तेलाचा मोठा खरेदीदार

भारत हा रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेलाची खरेदी करतो. २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर, अनेक युरोपीय देशांनी रशियासोबतच्या व्यापारावर बहिष्कार टाकला होता. अमेरिका आणि युरोपीय देशांनी रशियन तेलावर बंदी घातली होती. मात्र, भारत आणि चीनसारख्या आशियाई देशांनी रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी केले होते. भारत अजूनही रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत आहे.

## पुतीन यांच्याशी डोवाल यांची चर्चा...

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे सध्या रशियाच्या दौऱ्यावर असून त्यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी अमेरिकेने लावलेल्या अतिरिक्त कराबाबत चर्चा केली. भारताला आर्थिक संकटात टाकण्याचा अमेरिकेचा कट असून त्यातून तोडगा कसा काढायचा, हा या चर्चेतील मुख्य विषय होता. त्याचबरोबर ऑपरेशन सिंदूर च्या पार्श्वभूमीवर आणि भारताच्या कडक धोरणावरदेखील या नेत्यांमध्ये बैठक झाली. अमेरिका हे पाकिस्तानला झुकते माप देत असून तो प्रश्नही कसा सोडवायचा याबाबत डोवाल यांनी पुतीन यांच्याशी संवाद साधला.

### पाकिस्तानला झुकते माप..

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवडून आल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या दुसऱ्या कार्यकाळात भारताबाबत 'डूक' धरण्याची भूमिका स्वीकारली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी नेहमीच पाकिस्तानची पाठराखण केली असून झुकते माप दिले आहे.

पालिकेत गोंधळ

## मनसेचे पदाधिकारी आयुक्तांवर धावून गेले

# पालिकेच्या आवारात तीन तास राडा!

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिकेचे आयुक्त आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यामध्ये झालेल्या वादाचे पर्यवसान बुधवारी कार्यकर्ते आयुक्तांच्या अंगावर धावून जाण्यात झाले. 'कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी नाही, तर आणखी वेगळ्या उद्देशाने आले होते,' असा आरोप आयुक्तांनी केला, तर आयुक्तांनी गुंड म्हटल्याचा आरोप मनसे कार्यकर्त्यांनी केला. महापालिकेच्या आवारात सुमारे तीन तास हा गोंधळ सुरू होता. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी काम बंद आंदोलन करणार आहेत.**

## अधिकाऱ्यांची पोलिसांत तक्रार



महापालिका आयुक्त नवल किशोर राम बुधवारी दुपारी शहर स्वच्छतेबाबत बैठक घेत होते. त्या वेळी मनसेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे शिष्टमंडळासह आयुक्त कार्यालयात आले. महापालिका आयुक्तांच्या बंगल्यातून गायब झालेल्या वस्तूंच्या प्रकरणी निवेदन देण्यासाठी हे पदाधिकारी आले होते. मात्र, कार्यालयात बैठक सुरू असल्याने त्यांना भेट नाकारण्यात आली. त्यामुळे शिंदे यांच्यासह संतापलेल्या मनसेच्या कार्यकर्त्यांनी बैठक सुरू असलेल्या सभागृहात प्रवेश करून, 'आयुक्तांच्या बैठकीसाठी आम्ही थांबायचे का,' असा प्रश्न विचारला. त्यावर आयुक्तांनी, 'तुमचे निवेदन द्या, मग बघू,' असे त्यांना सांगितले.आयुक्तांनी हे हिंदीत सांगितल्याने चिडलेले शिंदे यांनी, 'मराठीत बोला, नाही तर तुम्हाला महाराष्ट्राच्या बाहेर पाठवून देऊ,' असे आयुक्तांना म्हटले. त्यानंतर आयुक्त आणि किशोर शिंदे यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला. त्याचे पर्यवसान अंगावर धावून जाण्यामध्ये झाले. 'शिंदे आणि त्यांच्याबरोबर आलेले कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी नाही, तर विशिष्ट उद्देशाने आले होते,' असा आरोप महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना केला. तर, 'आयुक्त आम्हाला गुंड म्हणाले असून, त्यांनी धमकी दिली,' असा दावा शिंदे यांनी केला.या घटनेनंतर निवेदन देण्यासाठी आलेले मनसेचे पदाधिकारी आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलनास बसले. काही वेळातच आयुक्तांच्या दालनाबाहेर मोठ्या प्रमाणात मनसे कार्यकर्ते जमा झाले आणि त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे महापालिकेची सगळी प्रवेशद्वारे बंद करण्यात आली. मनसेचे काही कार्यकर्ते महापालिका इमारतीच्या चौथ्या मजल्यापर्यंत पोहोचले आणि त्यांनी आयुक्तांच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या. यामुळे मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्तही तैनात करावा लागला. दुसरीकडे, दरवाजे बंद केल्याने अनेक कर्मचारी महापालिकेतच अडकून पडले. रात्री उशिरापर्यंत हा गोंधळ सुरू होता.महापालिका आयुक्तांना निवेदन देताना गोंधळ घातल्याप्रकरणी मनसेच्या कार्यकर्त्यांविरुद्ध बुधवारी रात्री उशिरा महापालिकेचे अधिकारी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास गेले. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी फिर्याद नोंदविण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.महापालिका आयुक्त नवल किशोर राम बुधवारी दुपारी शहर स्वच्छतेबाबत बैठक घेत होते. त्या वेळी मनसेचे माजी नगरसेवक किशोर शिंदे शिष्टमंडळासह आयुक्त कार्यालयात आले. महापालिका आयुक्तांच्या बंगल्यातून गायब झालेल्या वस्तूंच्या प्रकरणी निवेदन देण्यासाठी हे पदाधिकारी आले होते. मात्र, कार्यालयात बैठक सुरू असल्याने त्यांना भेट नाकारण्यात आली. त्यामुळे शिंदे यांच्यासह संतापलेल्या मनसेच्या कार्यकर्त्यांनी बैठक सुरू असलेल्या सभागृहात प्रवेश करून, 'आयुक्तांच्या बैठकीसाठी आम्ही थांबायचे का,' असा प्रश्न विचारला. .आयुक्तांनी हे हिंदीत सांगितल्याने चिडलेले शिंदे यांनी, 'मराठीत बोला, नाही तर तुम्हाला महाराष्ट्राच्या बाहेर पाठवून देऊ,' असे आयुक्तांना म्हटले. त्यानंतर आयुक्त आणि किशोर शिंदे यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला.

## मनसेचे ठिय्या आंदोलन

'शिंदे आणि त्यांच्याबरोबर आलेले कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी नाही, तर विशिष्ट उद्देशाने आले होते,' असा आरोप महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना केला. तर, 'आयुक्त आम्हाला गुंड म्हणाले असून, त्यांनी धमकी दिली,' असा दावा शिंदे यांनी केला.या घटनेनंतर निवेदन देण्यासाठी आलेले मनसेचे पदाधिकारी आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलनास बसले.

# पुणे जिल्ह्यातील २४ पर्यटक सुखरूप

## अडकून पडलेल्या पर्यटकांना सुखरूप आणण्यात येईल

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उत्तराखंडमधील धराली परिसरात ढगफुटीमुळे झालेल्या दुर्घटनेत पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील अवसरी आणि मंचर येथील २४ पर्यटक अडकले आहेत. संबंधित पर्यटक सुखरूप असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. तेथील रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने आणि इंटरनेट सुविधा बंद पडल्याने संपर्कात अडथळे येत असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.**



अवसरी येथील २२ पर्यटकांचा समूह एक ऑगस्ट रोजी उत्तराखंडमध्ये पर्यटनासाठी गेला आहे. मंचर येथील दोन पर्यटक वैयक्तिक गेले आहेत. २२ जणांच्या समूहाचे शेवटचे स्थान हृषीकेश येथील आहे. हे अंतर दुर्घटना घडलेल्या ठिकाणापासून दूर असून ते पर्यटक सुखरूप आहेत. वैयक्तिकरीत्या गेलेल्या पर्यटकांशी संपर्क होऊ शकलेला नाही. मंत्रालयातील मदत कक्षाच्या मदतीने संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले.ढगफुटीमुळे परिसरातील रस्ते, वीज, दूरध्वनी, इंटरनेट सुविधा कोलमडून पडल्याने संपर्कात अडथळे येत आहेत. ज्या कुटुंबातील व्यक्ती उत्तराखंड येथे गेले असतील त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील ०२०-२६१२३३२१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागातील अधिकारी विठ्ठल बनोटे यांनी केले आहे.उत्तराखंड येथील प्रशासनासोबत संपर्क साधण्यात आला असून, २२ पर्यटकांचा समूह सुखरूप आहे. स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने त्यांना मदत पुरवली जात आहे. रस्तेमार्ग सुरू होण्यास कालावधी लागेल.

## नातेवाइकांनी घाबरून जाऊ नये

त्यामुळे नातेवाइकांनी घाबरून जाऊ नये. अडकून पडलेल्या पर्यटकांना सुखरूप आणण्यात येईल.अवसरी येथील २२ पर्यटकांचा समूह एक ऑगस्ट रोजी उत्तराखंडमध्ये पर्यटनासाठी गेला आहे. मंचर येथील दोन पर्यटक वैयक्तिक गेले आहेत. २२ जणांच्या समूहाचे शेवटचे स्थान हृषीकेश येथील आहे. हे अंतर दुर्घटना घडलेल्या ठिकाणापासून दूर असून ते पर्यटक सुखरूप आहेत.

प्रभाग रचनेची उत्सुकता: पालिकेकडून २२ ऑगस्टला होणार जाहीर; शासनाच्या 'नगर विकास'कडे नकाशे सादर

# डिसेंबरमध्ये महापालिका निवडणुकीचे फटाके!

## एससी २०, एसटी ३, ओबीसी ३५, तर खुल्या प्रवर्गासाठी ७० जागा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चार सदस्यीय प्रभाग रचनेस राज्य शासनाच्या महापालिका निवडणूक विभागाने मंगळवारी (दि.५) सादर केली. प्रभागरचनेचा नकाशा यानंतर मान्यतेसाठी निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर २२ ऑगस्टला महापालिकेच्या वतीने प्रभागरचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रभाग रचनेची कशी आहे याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे.**




सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुढील काही महिन्यांमध्ये होणार आहे. तब्बल चार वर्षांनी निवडणुका होत असल्याने प्रचंड उत्सुकता आहे. प्रभागरचना कशी असणार, याबाबत तर्क-वितर्क लढकिले जात आहे. महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे त्याबाबत वारंवर विचारना केली जात आहे.

दरम्यान, महापालिका १२ मार्च २०२२ रोजी बरखास्त झाली. तेव्हापासून १२ मार्च २०२२ पासून महापालिकेमध्ये प्रशासक राज सुरु आहे. आयुक्त संपूर्ण कामकाज पाहत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे प्रभाग रचना तयार करण्याचे काम करत आहे.

शहराची लोकसंख्या सन २०११ प्रमाणे मानून प्रभाग रचना निश्चित करण्यात आली आहे. मापालिकेच्या समितीने तयार केलेल्या प्रभाग रचनेवर आयुक्त शेखर सिंह यांनी तपासणी करून रविवारी (दि.३) स्वाक्षरी केली. त्यानंतर नगरविकास विभागाकडे मंगळवारी प्रभाग रचना नकाशे (दि. ५) सादर केले आहेत. त्यानंतर हे नकाशे राज्य निवडणूक आयोगास ६ ते ११ ऑगस्ट या कालावधीत सादर केला जाणार आहे. आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप प्रभागरचनेचे नकाशे २२ ऑगस्टला प्रसिद्ध करून, त्यावर 28 ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार आहेत. दरम्यान प्रभाग रचना फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीनुसार असणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर नंतर दिवाळीनंतर डिसेंबर महिन्यात महापालिका निवडनुकांचा बार उडण्याची शक्यता आहे.

> महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे नगरविकास विभागाला सादर केले आहेत. राज्य निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाईल. एससी २०, एसटी ३, ओबीसी ३५, तर खुल्या प्रवर्गासाठी 70 जागा असतील. प्रभागातील आरक्षणात बदल होणार आहे.
> **-अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त निवडणूक विभाग

# 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' चे मुकूट पूजन

## छत्रपती संभाजी महाराजांचा सर्वांत उंच पुतळा; भाजपा आमदार महेश लांडगे यांची संकल्पना स्वप्नपूर्ती दृष्टीक्षेपात

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती आणि धर्मवीर संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पूर्णाकृती पुतळा, 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'चे मुकूट पूजन करण्यात आले. शंभूराजांचे मुकूट दर्शन होताच शिव-शंभूप्रेमींच्या जय शिवाजी... जय शंभुराजे... अशा गर्जना आणि मंत्रोच्चाराने संपूर्ण मोशी-बोऱ्हाडेवाडी परिसर दुमदुमला.**




भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे जगातील सर्वांत उंच "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याग, समर्पण आणि बलिदानाची प्रेरणा असलेल्या या पुतळ्याची उंची १४० फूट असून, चौथऱ्याची उंची ४० फूट आहे. या पुतळ्याच्या मुकूट पुजनासाठी शिव-शंभुप्रेमींनी गर्दी केली होती. तसेच, पुतळ्याच्या परिसरात हंबीरराव मोहिते यांचा १० फूट उंच पुतळा, १६ सरदार आणि मावळ्यांचे पुतळे, ओपन एअर थिएटर, ब्रॉंझ म्यूरल्स तसेच शंभुराजांची गाथा ऐकण्यासाठी स्क्रीनसह हॉलोग्राफिक प्रेझेंटेशनची सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, महाराजांच्या पुतळ्याचे काम दिल्ली येथील कार्यशाळेत करण्यात आले. त्याचे भाग या ठिकाणी कार्यशाळेत आणले आणि त्याची जोडणी करण्याचे काम सुरू आहे. या पुतळ्याद्वारे छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि कार्याची गाथा लोकांपर्यंत पोहोचवली जाणार असून शहराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पुतळ्याचा चौथरा आणि बांधणीचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यावर आमदार लांडगे यांचे कटाक्षाने लक्ष आहे. पुतळ्याचे काम भव्य-दिव्य करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्यातील शिव-शंभू प्रेमींसाठी हा 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

> " धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे अद्वितीय शौर्य आणि त्याग आजही भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे. 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' फक्त एक पुतळा नाही, तर राष्ट्रभक्ती आणि त्याग-समर्पणाचा स्त्रोत आहे. जगातील सर्वांत उंच असा हा पुतळा पिंपरी-चिंचवडकरांसाठी आणि तमाम शिव-शंभू प्रेमींसाठी गर्व आणि अभिमानाची बाब आहे. ही शंभुसृष्टी आपली संस्कृती, इतिहास आणि वारशाला उजाळा देणारा दीपस्तंभ ठरेल."
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### भगवंताचा आनंद हा निरुपाधिक असतो.

प्रत्येक मनुष्याची प्रवृत्ती भगवंताकडे जाण्याची असते, कारण त्याला आनंद हवा असतो. मनुष्याला आनंदाशिवाय जगता येत नाही. पण सध्याचा आपला आनंद हा नुसता आशेचा आनंद आहे. तो काही खरा आनंद नाही. उद्या सुख मिळेल या आशेवर आपण जगतो, पण ते सुख क्वचितच मिळते. ज्या आनंदातून दुःख निघत नाही तोच खरा आनंद. जगण्यामध्ये काहीतरी आनंद असला पाहिजे. जगणे जर आनंददायक आहे तर मग आपल्याला दुःख का होते ? वास्तविक, आपण कशाकरिता काय करतो हेच विसरतो. म्हणजे, मनुष्य जगतो आनंदासाठी, पण करतो मात्र दुःख ! दारूचा आनंद हा दारूची धुंदी आहे तोपर्यंतच असतो, त्याचप्रमाणे विषयापासून होणारा आनंद, तो विषय भोगीत असेपर्यंतच टिकतो. दृश्य वस्तू ही सत्य नसल्यामुळे ती अशाश्वत असते. अर्थात् तिच्यापासून मिळणारा आनंद हा देखील अशाश्वत असतो. आपण जगामध्ये व्याप वाढवितो, तो आनंदासाठीच वाढवितो. पण भगवंताच्या व्यतिरिक्त असणारा आनंद हा कारणावर अवलंबून असल्याने, ती कारणे नाहीशी झाली की तो आनंद पण मावळतो. यासाठी तो आनंद अशाश्वत होय. म्हणून खरा आनंद कुठे मिळतो ते पाहावे. खरा आनंद दृश्य वस्तूंमध्ये नसून वस्तूंच्या पलीकडे आहे. चिरकाल टिकणारा आनंद वस्तुरहितच असतो. म्हणून आनंदासाठी वस्तूच्या मागे लागणे बरोबर नाही. विषयाचा आनंद परावलंबी असतो, तर भगवंताचा आनंद निरुपाधिक असतो. स्वानंदस्मरणाव्यतिरिक्त जे स्फुरण तोच विषय समजावा. खरी आनंदी वृत्ती हीच दसरा-दिवाळीची खूण आहे. हास्य हे आनंदाचे व्यक्त स्वरूप आहे. कोणतीही वस्तू अस्तित्वात नसताना होणारा जो आनंद, तेच परमात्म्याचे व्यक्त स्वरूप आहे. आनंदाला जे मारक आहे ते न करणे म्हणजे वैराग्य, आणि आनंदाला बळकटी येण्यासाठी जे करणे त्याचे नाव विवेक होय. आनंद म्हणजे आत्मचिंतनाने येणारे मानसिक समाधानच होय. जो निःस्वार्थबुद्धीने प्रेम करतो, त्याला आनंद खास मिळतो. घेणारा ' मी ' जेव्हा देणारा होतो त्याच वेळेस त्याला खरा आनंद होतो. ब्रह्मानंद हा प्रत्येकाच्या हृदयात स्वयंभू आहे. वृत्ती वळवून तो चाखला पाहिजे. एकांतात स्वस्थ बसावे, रामाला आठवावे, त्याच्या पायावर मस्तक ठेवून त्याला म्हणावे, " रामा, माझे मन शुद्ध कर. देहबुद्धी येऊ देऊ नको. तुझे चरण, तुझे हास्य, मला सदा पाहू दे. तू माझ्या मस्तकावर वरदहस्त ठेव. " रामाला प्रेमाने आळवून, राम परमानंदरूप आहे असे जाणून, त्याच्याशी अनन्य होऊन राहावे. मी कुणीच नाही, सर्व राम आहे आणि मी रामाचा आहे, या गोड भावनेत आनंदाने असावे.

**बोधवचनः- मनात प्रत्येक संकल्प उठताच त्यावर रामनामाचा शिक्का असावा.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# माधुरी हत्तीणीला मोकळा श्वास घेता येईल, तेथे ठेवा !

**कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील मठातील माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीच्या वास्तव्यावरून सध्या जोरदार उलट सुलट चर्चा सुरू आहे. हे प्रकरण आता एवढ्या थराला जाऊन पोहोचले आहे की त्यावर कोल्हापुरात मोर्चे निघाले आहेत आणि थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व संबंधितांची, आमदारांची खासदारांची बैठक घेऊन उचित तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे !**



### संपूर्ण प्रकरण न्यायप्रविष्ट !

माधुरी हत्तीणीला गुजरातमधील 'वनतारा' या प्राण्यांच्या रुग्णालयामध्ये हलविण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला, त्यानुसार तिला हलवण्यात आले. पण, प्रत्यक्षात तेथील स्थानिक मंडळींनी जो गोंधळ घातला आहे, क्षणोक्षणी भूमिका बदलल्या आहेत, त्याला जबाबदार कोण ? ही हत्तीण पुन्हा नांदणी मठाला मिळावी, यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल आणि तशी याचिकाही दाखल करेल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर सर्वांनी निःश्वास टाकला. त्यामुळेच, नेमके हे प्रकरण काय आहे? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

### गंमत फारच भारी आहे..

या संपूर्ण प्रकरणात जो काही हलगर्जीपणा आहे, त्याचे प्रथम विश्लेषण करू या. हे पुरावे शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि त्यांचे धर्मबांधव असलेले मठ अधिकारी यांनी स्वतःच नकळत पुरवले आहेत, हे सर्वांनी लक्षात घ्या. ते मुळामध्ये या हत्तीणीला झटकू पाहत होते, आणि ती नांदणी मध्ये नको म्हणून त्यासाठी प्रयत्न करत होते, नंतर हीच मंडळी हत्तीण गेल्यानंतर टाहो फोडत आहेत, असेच दुर्दैवाने म्हणावे लागते!

### 'पेटा' ने पुरावे घशात घातले..

मुक्या प्राण्यांची काळजी घेण्यासंदर्भात, कोणी कुठे अडकले असल्यास त्याला सोडवण्यात आणि प्राण्यांचे जीवन सुसह्य व्हावे म्हणून 'पेटा' ही संघटना कार्यरत आहे. त्यांनीच पत्रकारांना पुरावे दिले असून कायद्याची जाण असणारे यावर आणखी प्रकाश टाकू शकतील. पण, या प्रकरणात राजकारण करणाऱ्यांचा बुरखा मात्र या 'पेटा' ने टराटरा पडला असून सर्व पुरावे त्यांच्या घशात घातले आहेत!

### पुरावे वाचा सविस्तरपणे !

१) माधुरी तीन वर्षांची असताना तिला तिच्या आईपासून वेगळे करून मठात आणले गेले.

२) दि. २२ डिसेंबर २०१७ रोजी माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीणीने एका मठ पदाधिकाऱ्याला ढकलून ठार मारले.

३) जवळपास दोन महिने सतत फॉलोअप घेऊन शेवटी माजी खासदारांचा वेळ मिळाल्यावर मठाच्या सर्व ट्रस्टीनी राजू शेट्टींची भेट घेतली. दि. ७ एप्रिल २०१८ ला 'आम्हाला हत्ती संभाळायला येथून पुढे जमेना झालाय' असे पत्र मठाने राजू शेट्टींना दिले .

४) दि. ७ एप्रिल २०१८ रोजीच शेट्टी यांनी ते पत्र पुढे वन खात्याला पाठवले आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला कल्पना देऊन त्याबद्दल पाठपुरावा केला.

५) २०१८ ते २०२० पर्यंत तो हत्ती खपावा, म्हणून राजू शेट्टी यांनी 'पेटा' चे वकील खुशबु गुप्ता यांबरोबर हत्ती दाखवणे, त्याच्या जखमा मोजणे, तो म्हातारा झालाय, याचे सर्टिफिकेट देणे, 'पेटा' च्या वकीलांना जैन मठातील लोकांशी भेटी घडवून तो हत्ती न्यायला लागेल, अशा मुलाखती घेणे. 'पेटा' च्या पुरावा गटाला मठातील सर्व सोयी, गैरसोयी यांचे सविस्तर फोटो आणि व्हिडिओ काढून द्यायची परवानगी देणे वगैरे सगळे प्रकार बिनबोभाट केले.

६) खऱ्या अर्थाने 'गेम' सुरू होतो येथूनच ! अचानक का कुणास ठाऊक, पण या सगळ्यातून अचानक मठाला, राजु शेट्टीना एक नवी संधी दिसू लागते. २०२० पर्यंत खपवायचा हत्ती, आता नवी संधी घेऊन आला होता..आणि त्यात या मठातील तसेच राजू शेट्टी यांच्यासारखी चाणाक्ष मंडळी लक्ष घालून लागली संधीचे सोने करण्यासाठी !

### भाड्याने हत्ती देण्याचा धंदा..

या सर्व प्रकारानंतर अचानक २०२१ पासून २०२४ पर्यंत तो हत्ती बेकायदेशीररीत्या ट्रान्सपोर्ट करून चौदा वेगवेगळ्या ठिकाणी चार ते पाच लाख रुपये घेऊन भाड्याने पाठवण्याचा नवा धंदा सुरू झाला, या सर्वांच्या आशीर्वादाने.. त्यातून त्यांनी बक्कळ कमाई केली !

### तेलंगणाची मोठी कृपा..

दि.२७ जुलै २०२३ ला हा हत्ती भाड्याने मोहरमच्या कार्यक्रमाला देण्यात आला..पण, दैवी शक्ती खरे च अस्तित्वात असते, याची प्रचिती नांदणीकरांना आली. मोहरमचा कार्यक्रम करून परत येताना प्रत्यक्ष दैवी शक्ती म्हणा किंवा देव म्हणा..या हत्तीची बेकायदेशीर वाहतूक तेलंगणाच्या वन विभागाने पकडली आणि 'पेटा' ला 'बासनात गुंडाळलेला' हा प्रकार चव्हाट्यावर आणण्यास भाग पाडले. दि. ३० जुलै २०२३ ला वन खात्याने हा ट्रक पकडला आणि पुढे सहा दिवसात 'पेटा' कामाला लागले !

### मठाच्या विरोधातील पुरावे कोर्टात..

पूर्वी, राजू शेट्टीनी हातात आणून दिलेले सगळे पुरावे मठाच्या विरोधात 'पेटा' ने कोर्टात वापरले.. दि. ३० जुलै २०२३ ला उद्योगपती अंबानी यांच्या 'वनतारा' चे बांधकाम कदाचित सुरू पण केले नसावे..!

### कोर्टाकडे घसघशीत पुरावे..

माधुरी ला अल्थरायटीस झालेले आणि दुखापत झालेले सगळे फोटो तसेच व्हिडिओ कोर्टाला मिळाले. दि. २० जून २०२४ ला भारतीय वनरक्षक खात्याने स्पष्ट केले, की गुजरातमधील वनतारा येथे जगातील सर्वात हायटेक हत्तीचा दवाखाना आणि पुनर्वसन केंद्र उघडले असून तेथे तिथ या अल्थरायटीस झालेल्या हत्तीला पाठवा. तसे त्यांनी कोर्टालाही लेखी दिले.

### किती दुःखदायक असेल..

दि. 30 जुलै २०२३ ला हत्ती पकडला गेला आणि ३० जुलै २०२५ ला तो हत्ती वनतारा मधे गेला.. तब्बल दोन वर्षे तो हत्ती अल्थरायटीस ने कसा तडफडला असेल, किती दुःखदायक घटना म्हणावी लागेल !

### याला जबाबदार कोणाला धरायचे?

या सर्व प्रकाराचा दोष कोणाला द्यायचा? तेलंगणाचे वन अधिकारी? 'पेटा' चे वकील? हायकोर्ट सुप्रीम कोर्ट ? का हत्ती म्हातारा झाला म्हणून लिहून देणारे मठाधिपती ? का २०२० पर्यंत नको असलेला हत्तीचा अचानक धंदा करणारे लोक ? का हत्तीचा अल्थराईटीस बरा व्हावा, म्हणून जगातील सर्वात हायटेक हत्तीचा दवाखाना वनतारा ची निवड करणारे महाराष्ट्र वन विभाग अधिकारी?

### सगळे फक्त रान उठवण्यासाठी..

फक्त उद्योगपती अंबानी यांच्या बद्दल लोकांना वाईट सांगून, विष पेरणी करून जनप्रक्षोभ घडवायचा आणि जैन समाज विरूध्द सरकार असा फेक नॅरेटिव्ह सेट करणारी ही नथद्रष्ट मंडळी !

### हत्ती परत आणा सुविधा द्या..

आता माधुरी वनतारा मध्ये मोकळा श्वास घेत आहे तर घेऊ द्या, हत्ती परत आणा पण त्याला सर्व सुविधा देण्याचे वचन द्या. कसलेही राजकारण न करता त्या मुक्या जनावराला मनसोक्त वावर करू द्या आणि मोकळा श्वास घेऊ द्या, एवढी सर्वसामान्य नागरिकाची इच्छा आहे, हे नक्की!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.




**लोकशाही पद्धतीने निवडून आल्यानंतर निरंकुश सत्ता उपभोगायची आणि लोकशाही मार्गानेच पराभव झाल्यानंतर मात्र, या व्यवस्थेची प्रतीके उद्ध्वस्त करण्यास निघायचे, असे आधुनिक ‘टूलकिट’ गेल्या काही वर्षांमध्ये दोन नेत्यांनी ठळकपणे आचरले. यांतील एक आहेत अमेरिकेचे माजी आणि इच्छुक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प. दुसरे आहेत ब्राझीलचे माजी, पराभूत अध्यक्ष जाइर बोल्सोनारो.**

# ब्राझीलचा ‘उठावखोर’ गोत्यात!



या दोघांच्या कृत्यामध्ये एक मूलभूत फरक मात्र आहे. ट्रम्प यांनी निवडणूक निकाल जाहीर होऊ लागताच आकांडतांडव केले. निकालांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पावित्र्याविषयी शंका उपस्थित करण्यास सुरुवात केली आणि पराभव सुनिश्चित झाल्यानंतर अमेरिकी कायदेमंडळाच्या इमारतीवर आपल्या समर्थकांना चाल करून जाण्यास चिथावले. ब्राझीलची अध्यक्षीय निवडणूक त्या घटनेनंतर (६ जानेवारी २०२१) जवळपास वर्षभराने झाली. त्या निवडणुकीत पराभव होणार याची आधीच चाहूल लागल्यामुळे, ही निवडणूकच मोठा घोटाळा असल्याची बोगस माहिती बोल्सोनारो समर्थकांमार्फत पसरवली गेली. जेणेकरून त्या एका कारणास्तव निवडणूक प्रक्रियेतील लष्करी हस्तक्षेप समर्थनीय ठरावा. या प्रयत्नांमध्ये काही लष्करी अधिकारी, पोलीस अधिकारी, गुन्हेगारी टोळ्या सहभागी असल्याचा निष्कर्ष ब्राझीलच्या पोलिसांनी काढला. या पोलिसांना तपासाचा सर्वाधिकार ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाकडून बहाल झाला आहे. यासंदर्भात गेल्या आठवड्याभरात विविध ठिकाणी छापासत्र झाले, काही जणांना अटक करण्यात आली. उठाव करून ब्राझीलमधील लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा कट होता. अशा अस्थिर वातावरणात त्यावेळी अध्यक्ष असलेले बोल्सोनारो यांचा प्रदीर्घकाळ सत्तेवर राहण्याचा मार्ग मोकळा होणार होता.ऑक्टोबर २०२२मध्ये झालेली निवडणूक बोल्सोनारो हरले. ही निवडणूक प्रदीर्घ काळ लांबली आणि अंतिम निवडीसाठी फेरनिवडणुकीचा मार्ग अवलंबावा लागला होता. पण पराभव झाल्यानंतर काही दिवसांनी, विशेषतः ८ जानेवारी २०२३ रोजी राजधानी ब्रासिलिया शहरात बोल्सोनारो समर्थकांनी धुडगूस घातला. त्यांना लष्कराकडून अपेक्षित समर्थन मिळाले नाही. तरीदेखील अध्यक्षीय प्रासाद, कायदेमंडळाची इमारत, सर्वोच्च न्यायालयाची इमारत अशा महत्त्वाच्या ठिकाणांवर हे समर्थक चाल करून गेले. बोल्सोनारो या उठावखोरीमध्ये सकृद्दर्शनी दोषी आढळले आहेत. गुन्हा सिद्ध झाल्यास त्यांना २९ वर्षांचा कारावास होऊ शकतो. आपण निर्दोष असल्याचे आणि आपला छळ सुरू असल्याचे ते आजही सांगतात. मात्र पोलीस तपासास साह्य करण्याची भूमिका त्यांनी घेतली असून, पारपत्रही पोलिसांच्या हवाली केले आहे. गतवर्षी ब्राझीलियन काँग्रेसच्या एका समितीने त्यांना उठावखोरीप्रकरणी दोषी ठरवले. तत्पूर्वी एका न्यायालयाने याच कारणास्तव त्यांच्यावर २०३०पर्यंत कोणतीही निवडणूक लढवण्यावर बंदी आणली. बोल्सोनारो यांचे आदर्श डोनाल्ड ट्रम्प! गतवर्षी निवडणूक हरल्यानंतर ते अमेरिकेतच ट्रम्प यांचा पाहुणचार घेण्यासाठी गेले होते. रीतसर झालेल्या निवडणुकीच्या सत्यतेविषयी चुकीची माहिती पसरवायची, समर्थकांना चिथावून रस्त्यावर आणायचे आणि लोकशाहीच्या प्रतीकांवर चाल करून जायची हा धक्कादायक प्रकार अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच ६ जानेवारी २०२१ रोजी घडला होता. असे उठाव आणि जानेवारी महिना हे ट्रम्प यांच्याप्रमाणेच बोल्सोनारो यांनाही आदर्शवत वाटले असावेत. पण अमेरिकेइतकी ब्राझीलची न्याय व तपास यंत्रणा गोंधळलेली दिसत नाही.अमेरिकेमध्ये तर विविध न्यायालयांमध्ये ट्रम्प यांच्याविरुद्ध उठावखोरीचा खटला दाखल करण्यावरच एकमत होत नाही. त्यांनी अशी कृती केली- म्हणजे चिथावणी दिली त्यावेळी ते अध्यक्ष होते. अशा व्यक्तीस काही स्वरूपाच्या गुन्ह्यांपासून पदसिद्ध संरक्षण मिळते किंवा कसे यावरच तेथे अजून खल सुरू आहे. तशात अमेरिकी अध्यक्षपदाच्या आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार म्हणून ट्रम्पच उतरवले जातील.

## प्रासंगिक »

### सच्चेपणाचा सोस!

***न्यायालयाने उपस्थित केलेला सच्चेपणाचा मुद्दा आणि तो सिद्ध करण्यास सच्चेपणाची कसोटी ज्याप्रमाणे नागरिकांस सर्वसाधारणपणे लावता येईल.***

प्रश्न राहुल गांधी यांचा नाही. ते चीनच्या घुसखोरीबाबत जे बोलले ते योग्य की अयोग्य हादेखील नाही. अलीकडे आपल्याकडे प्रत्येक मुद्द्याचे झालेले राजकीयीकरण लक्षात घेता चीनच्या घुसखोरीबाबतही मतैक्य असणे शक्य नाही. त्यामुळे त्या विधानाच्या सत्यासत्यतेबाबत भाष्य करण्याचे कारण नाही. पण त्याच वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या याबाबतच्या भाष्यावर मात्र व्यक्त होणे आवश्यक ठरते. चीनच्या घुसखोरीबाबत राहुल गांधी यांच्या विधानांवर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना सुनावले आणि ‘तुम्ही सच्चे भारतीय असाल तर असे काही बोलणार नाही’, असेही वर ऐकवले. मुद्दा होता चीनच्या घुसखोरीत भारताने दोन हजार चौ. किमीचा भूप्रदेश गमावला असा राहुल गांधी यांचा आरोप. त्यावर ‘तुम्ही असे कसे बोलू शकता... तुम्ही त्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर होता काय?

**यंदाच्या अर्थसंकल्पात लोकानुनयी घोषणा असतील, ही अपेक्षा खोटी ठरवून देश मजबूत करण्यासाठी सिमेंट, ऊर्जानिर्मिती, कोळसा या उद्योगांना तसेच अन्य नवउद्योगांना मदतगार ठरणारे निर्णय सरकारने घेतले. गरीबांसाठी सौरऊर्जा, घरांसाठी साह्य आणि आरोग्य विम्यासारख्या सुविधांची व्याप्ती वाढवण्याचा विचारही यंदा दिसून आला.**

# लोकानुनय नव्हे; देशाची उभारणी!



दशकभरापूर्वी वित्तभांडवलाच्या जागतिक क्षेत्रात कायकाय कूट-शब्द वापरले जात, हे जरा आठवून पाहा- ‘फ्रॅजाइल फाइव्ह’ आणि ‘पीआयआयजीएस’ म्हणजे ‘पीग्ज’ हे चटकन आठवतील. यापैकी दुसरा शब्द हा मुख्यत: युरोपातल्या कर्जबाजारी देशांसाठी वापरला गेला, पण अतिनाजूक पाचांमध्ये (फ्रॅजाइल फाइव्ह) भारताचाही समावेश त्या वेळी केला जाई. कारण, ज्या अर्थव्यवस्था नुकत्या वाढू लागलेल्या असूनही इतरांवर फार अवलंबून होत्या आणि त्यामुळे बेभरवशी होत्या, त्यात आपणही मोजले जात होतो- हे सारे, द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ पंतप्रधानपदी असताना आणि त्यांचे अर्थमंत्रीसुद्धा बुद्धिवंत असताना होत होते. या खिन्न अवस्थेतून आणि आर्थिक स्तब्धतेपासून ते ‘जगातील एकमेव उज्ज्वल स्थाना’पर्यंतच्या प्रवासाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. पुढील काही महिन्यांत आपण सार्वत्रिक निवडणुकांना सामोरे जात असताना, अर्थव्यवस्थेची हाताळणी हा पंतप्रधानांच्या प्रगतीपुस्तकातील सर्वात तेजस्वी तारा आहे. हा आर्थिक संदर्भ आणि त्यातून येणारा राजकीय आत्मविश्वास यंदाच्या लेखानुदानातही (हंगामी अर्थसंकल्पातही) दिसून आला.लोकानुनयी अर्थसंकल्पाचीच अपेक्षा साऱ्यांना असूनसुद्धा, भारताचे दीर्घकालीन फायदे शीर्षस्थानी ठेवण्याच्या आपल्या ध्येयावर सरकार यंदा ठाम राहिले. याला हे देऊ कर, त्या गटाला ते आश्वासन दे, अशा अल्प-मुदतीच्या निवडणूक लाभांच्या दबावाखाली हे लेखानुदान आलेले नाही. याउलट, विकसित भारताचा मार्ग ज्या पायावर भक्कमपणे उभारला जाईल, असा पायाच लेखानुदानाने मजबूत केलेला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात, शाश्वत आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक संरचनात्मक बदल दिसून आले आहेत. त्यातही विशेष म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. या पायाभूत सुविधा फक्त अभियांत्रिकीपुरत्या नसून सामाजिक आणि डिजिटलही आहेत. ताज्या अर्थसंकल्पातही हे सूत्र कायम राहिले आहे. पायाभूत सुविधांवरील खर्चात आणखी ११.११ टक्क्यांनी वाढ करण्याचा प्रस्ताव आहे, एकंदर पायाभूत सुविधांची तरतूद यामुळे गेल्या चार वर्षांत तिप्पट झालेली आहे! पायाभूत सुविधांमध्येही यंदा रेल्वेवर भर देण्यात आला आहे. बंदरांशी जोडलेली वाहतूक-व्यवस्था, अत्यंत वर्दळीची रहदारी हे लक्षात घेऊन आणि ऊर्जा, खनिजे आणि सिमेंट क्षेत्रांसाठी उभारले जाणारे रेल्वेचे खास कॉरिडॉर मालवाहतुकीचा दर्जा आणि वेग सुधारतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मतभेदांवर तोडगा

## माजी मुख्यमंत्र्यांविरोधात शिंदेंचा दिल्लीत शड्डू

# राजकीय चर्चेबाबत शिंदेंनी मौन बाळगले!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महायुती सरकारमधील मतभेदांवर तोडगा काढण्यासाठी दिल्लीत दाखल झाल्याचे मानले जात असले तरी, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हेही राजधानीत मुक्कामी आले. त्यामुळे बुधवारी दिवसअखेर शिंदेंना एकाच वेळी दिल्लीतून आजी-माजी मुख्यमंत्र्यांविरोधात शड्डू ठोकावे लागल्याचे चित्र उभे राहिले.**

## मतभेद असल्याच्या चर्चेला उधाण




दिल्लीमध्ये बुधवारी एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. संसदेच्या शहांच्या दालनामध्ये शिंदे यांनी पक्षाच्या खासदारांसह शहांची भेट घेती, त्यानंतर शिंदेंनी स्वतंत्रपणे शहांशी चर्चा केली. शहांच्या भेटीनंतर पंतप्रधानांच्या लोककल्याण मार्गावरील निवासस्थानी शिंदे यांनी सहकुटुंब भेट घेतली असली तरी, दोन्ही नेत्यांनी स्वतंत्रपणे चर्चा केली. या दोन्ही भेटीतील राजकीय चर्चेबाबत शिंदेंनी मौन बाळगले. मात्र, गाठीभेटी घेतल्यानंतर कुठल्याही अडचणीतून सकारात्मक मार्ग निघू शकतो, असे शिंदे म्हणाले. गेल्या आठवड्यामध्ये अमित शहांना भेटण्यासाठी शिंदे दिल्लीमध्ये आले होते पण, शहांशी त्यांची भेट होऊ शकली नाही. या दिल्लीदौऱ्यामध्ये शिंदेंनी शहांशीच सविस्तर चर्चा केली असे नव्हे तर मोदींच्या निवासस्थानीही ते तासाभराहून अधिक वेळ होते. मोदी व शहांची भेट घेतल्यानंतरही शिंदेंनी बुधवारी रात्री दिल्लीत तळ ठोकला असल्याने चर्चांना उधाण आले.शिंदे गुरुवारी दुपारनंतर दिल्ली सोडणार आहेत. त्यामुळे दिवसभरात शिंदे पुन्हा काही राजकीय भेटीगाठी घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या आठवड्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संसदेत अमित शहांशी सुमारे २० मिनिटे चर्चा केली होती. त्यानंतर मंत्रिमंडळातील बदलांची चर्चा होती. शिंदेंच्या सलग दुसऱ्या दिल्लीवारीमुळे महायुतीमध्ये फडणवीस व शिंदे यांच्यातील मतभेद तीव्र झाल्याची चर्चा तीव्र झाली.शिंदेंच्या भाजपच्या नेत्यांशी चर्चा सुरू असतानाच ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे दिल्लीत येऊन दाखल झाले. उद्धव व आदित्य ठाकरे यांनी बुधवारी ६ जनपथवर जाऊन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली.

ठाकरे गुरुवारी संसदेतील पक्षाच्या कार्यालयाला भेट देणार असून काही राजकीय नेत्यांनाही भेटणार आहेत. शिंदेंनंतर लगेच उद्धव ठाकरेही संसदेत जाणार असल्यामुळेही तर्कवितर्क केले जात आहेत.गुरुवारी दिवसभर दिल्लीत उद्धव ठाकरेंच्याही भेटीगाठी होतील. त्याचवेळी शिंदेही दिल्लीत असतील. ह्यआम्ही लोकांच्या कल्याणासाठी लोककल्याण मार्गावर जातो, ते (उद्धव ठाकरे) मात्र जनपथावर जातातह्न, असा टोमणा शिंदे यांनी बुधवारी ठाकरेंवर शाब्दिकवार केला. ठाकरे यांची गुरुवारी दिल्लीत सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद होणार असून दोन्ही नेत्यांमध्ये कलगीतुरा रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे.उद्धव ठाकरे गुरुवारी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची भेट घेणार असून इंडिया आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीमध्ये सहभागी होती. राहुल गांधी यांच्या निवासस्थानी स्नेहभोजनाचाही कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ठाकरे शुक्रवारी दुपारी मुंबईला रवाना होणार आहेत. दिल्लीमध्ये बुधवारी एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. संसदेच्या शहांच्या दालनामध्ये शिंदे यांनी पक्षाच्या खासदारांसह शहांची भेट घेती, त्यानंतर शिंदेंनी स्वतंत्रपणे शहांशी चर्चा केली. शहांच्या भेटीनंतर पंतप्रधानांच्या लोककल्याण मार्गावरील निवासस्थानी शिंदे यांनी सहकुटुंब भेट घेतली असली तरी, दोन्ही नेत्यांनी स्वतंत्रपणे चर्चा केली. या दोन्ही भेटीतील राजकीय चर्चेबाबत शिंदेंनी मौन बाळगले.

### उद्धव ठाकरेही दिल्लीत

मात्र, गाठीभेटी घेतल्यानंतर कुठल्याही अडचणीतून सकारात्मक मार्ग निघू शकतो, असे शिंदे म्हणाले.गेल्या आठवड्यामध्ये अमित शहांना भेटण्यासाठी शिंदे दिल्लीमध्ये आले होते पण, शहांशी त्यांची भेट होऊ शकली नाही. या दिल्लीदौऱ्यामध्ये शिंदेंनी शहांशीच सविस्तर चर्चा केली असे नव्हे तर मोदींच्या निवासस्थानीही ते तासाभराहून अधिक वेळ होते.

# ‘महादेवी’ कोल्हापुरात परतणार!

## वनतारा संस्थेची मुख्यमंत्र्यांशी चर्चा; पुनर्वसन केंद्राचा राज्याकडून प्रस्ताव

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**माधुरी ऊर्फ महादेवी हत्तिणीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठानजीक वन विभागाने निवडलेल्या जागेवर पुनर्वसन केंद्र उभारण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव असून त्यासाठी गुजरातमधील ‘वनतारा’ संस्थेने त्यासाठी मदत करण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वनतारा व्यवस्थापनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बुधवारी मुंबईत चर्चा केल्यानंतर ही माहिती दिली.**



दिल्लीतही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केली. महादेवी हत्तिणीचा ताबा परत मिळविण्यासाठी नांदणी मठाच्या व्यवस्थापनाकडून आणि राज्य सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका सादर करण्यात येणार आहे. या याचिकेत सहभागी होण्याचा निर्णय वनतारा व्यवस्थापनाने घेतला असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

आम्ही केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन केले आणि महादेवी हत्तिणीचा ताबा घेण्याचा आमचा कुठलाही प्रयत्न नव्हता.

विविध समाजांच्या धार्मिक भावनांचा आम्ही सन्मानच करतो, असे स्पष्टीकरण वनतारा व्यवस्थापनाकडून फडणवीस यांच्याकडे करण्यात आले. महादेवी हत्तिणीच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तिला वनतारा संस्थेमध्ये पाठविले आहे. त्यामुळे वनताराच्या देखरेखीखाली नांदणी मठाजवळच पुनवर्ससन केंद्र उभारणीचा प्रस्ताव राज्य सरकारने सुचविला आहे. हा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयातील याचिकेच्या माध्यमातून सादर केला जाणार आहे.

### ‘वनतारा’चे अधिकारी कोल्हापुरात

पुनर्वसन केंद्र उभारल्यास हत्तिणीला नांदणीला आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून परवानगी मिळू शकेल, अशी सरकारला आशा आहे.कोल्हापूर : याकरिता सर्वोच्च न्यायालयात नांदणी मठ, वनतारा व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने पुनरावलोकन याचिका दाखल केली जाणार आहे, असे स्पष्टीकरण वनताराचे मुख्य कार्यकारी अधिकारी विहान करणी यांनी बुधवारी येथे केले.

विरोध

## भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल रशियाला रवाना

# आणखी टॅरिफ लावण्याची धमकी!

**ऊर्जा क्षेत्रातील व्यापाराची चर्चा होणार**

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि अमेरिका यांच्या दरम्यान व्यापार कराराबाबत अद्याप सहमती झालेली नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारतावर दबाव वाढविण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. तसेच रशियाकडून भारत मोठ्या प्रमाणात इंधन आयात करतो, तसेच शस्त्रास्त्र खरेदी करतो, यावर ट्रम्प यांनी आक्षेप नोंदविला होता. यानंतर आता भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हे रशियात पोहोचले आहेत. त्यांचा हा नियोजित दौरा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र अमेरिकेच्या टॅरिफ वाढीमुळे या दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.**



अजित डोवाल यांच्या रशिया भेटीमागे संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील व्यापाराची चर्चा होणार असल्याचे सांगितले जात आहे. रशियातील वृत्त संस्था TASS च्या वृत्तानुसार, अजित डोवाल यांच्या दौऱ्यात भारत आणि रशियातील द्वीपक्षीय भागीदारी, संरक्षण क्षेत्र आणि त्याच्याशी संबंधित इतर विषयांवर चर्चा होणार आहे. त्यासाठी अजित डोवाल मंगळवारीच मॉस्कोत पोहोचले आहेत.टासने आपल्या वृत्तात पुढे म्हटले की, अजित डोवाल आणि रशियाचे प्रतिनिधी वरील विषयावर चर्चा करत असताना वर्तमान जागतिक परिस्थिती आणि भू-राजकीय तणाव यावरही चर्चा करू शकतात. याशिवाय भारताला रशियन तेलाचा पुरवठा करण्यासंदर्भातही चर्चा केली जाऊ शकते.३१ जुलै रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती. भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था मृतावस्थेत असल्याचेही ते म्हणाले होते.

युक्रेन-रशिया संघर्षात भारताने भूमिका घेतली नसल्याबद्दलही त्यांनी राग व्यक्त केला होता. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारतावर लक्षणीय प्रमाणात टॅरिफ लादले जाईल, असा इशारा दिला आहे.दरम्यान अमेरिकेकडून होत असलेल्या आरोपांवर भारतानेही प्रत्युत्तर दिले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी सांगितले की, अमेरिका आणि युरोपीय महासंघही रशियाकडून त्यांना आवश्यक असलेल्या वस्तूंची खरेदी करत आहे. अमेरिका अणुऊर्जा निर्मितीमध्ये लागणारे युरेनियम, विद्युत वाहनांना लागणारे पॅलेडियम आणि खते रशियाकडून आयात करत आहे. त्यामुळे फक्त भारताला लक्ष्य करणे अन्यायकारक आणि अनावश्यक आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे म्हटले. भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या एस-४०० या डिफेन्स मिसाइल सिस्टीम खरेदीवरही चर्चा होणार असल्याची माहिती मिळत आहे. तसेच भारताची संरक्षण यंत्रणा आणखी बळकट करण्यासाठी रशियाच्या एसयू ५७ या लढाऊ विमानांची खरेदी करण्याबाबतही चर्चा या भेटीत होऊ शकते. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हेदेखील २७ आणि २८ ऑगस्ट रोजी रशियाचा दौरा करणार आहेत. अजित डोवाल यांच्या रशिया भेटीमागे संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील व्यापाराची चर्चा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

रशियातील वृत्त संस्था TASS च्या वृत्तानुसार, अजित डोवाल यांच्या दौऱ्यात भारत आणि रशियातील द्वीपक्षीय भागीदारी, संरक्षण क्षेत्र आणि त्याच्याशी संबंधित इतर विषयांवर चर्चा होणार आहे. त्यासाठी अजित डोवाल मंगळवारीच मॉस्कोत पोहोचले आहेत.टासने आपल्या वृत्तात पुढे म्हटले की, अजित डोवाल आणि रशियाचे प्रतिनिधी वरील विषयावर चर्चा करत असताना वर्तमान जागतिक परिस्थिती आणि भू-राजकीय तणाव यावरही चर्चा करू शकतात. याशिवाय भारताला रशियन तेलाचा पुरवठा करण्यासंदर्भातही चर्चा केली जाऊ शकते.३१ जुलै रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती.

### परराष्ट्र मंत्रालयाने काय उत्तर दिले?

भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था मृतावस्थेत असल्याचेही ते म्हणाले होते. युक्रेन-रशिया संघर्षात भारताने भूमिका घेतली नसल्याबद्दलही त्यांनी राग व्यक्त केला होता. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारतावर लक्षणीय प्रमाणात टॅरिफ लादले जाईल, असा इशारा दिला आहे.दरम्यान अमेरिकेकडून होत असलेल्या आरोपांवर भारतानेही प्रत्युत्तर दिले आहे.

# उत्तरकाशी ढगफुटी संकट : निम्मे धराली गाव गाळाखाली

## 190 जणांची सुटका, केरळचे 28 पर्यटक बेपत्ता, भूस्खलनाने रस्ते बंद

। उत्तरकाशी (उत्तराखंड) ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात मंगळवारी झालेल्या ढगफुटीमुळे धराली गावात भयंकर स्थिती निर्माण झाली आहे. या दुर्घटनेनंतर गावातील किमान निम्मा भाग गाळाखाली आणि पाण्याखाली दबला असून, आतापर्यंत १९० नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. मात्र, केरळमधील २८ पर्यटक बेपत्ता असून त्यांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.**



खराब हवामानामुळे बचाव कार्यात अडथळा; जळगावचे १९ पर्यटक अडकल्याची भीती

बचाव पथकाने बुधवारी घटनास्थळी एक मृतदेह बाहेर काढला असून आतापर्यंत या दुर्घटनेत मृतांची संख्या चारवर पोहोचली आहे. घटनास्थळी पावसाचा जोर कायम असल्याने, शोध व बचाव कार्यात अडथळे निर्माण होत आहेत.

धराली हे गंगोत्रीकडे जाणाऱ्या मार्गावरील महत्त्वाचे ठिकाण असून येथे अनेक हॉटेल्स व निवासस्थाने आहेत. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक कुटुंबांचे संपर्क तुटले असून काही जणांचे संपूर्ण व्यवसाय या आपत्तीत वाहून गेले आहेत.

धराली गावाकडे येणारे सर्व रस्ते भूस्खलनामुळे बंद झाले असून, शेजारच्या हर्सिल भागातील लष्करातील ११ जवानांचा देखील संपर्क तुटला आहे. केरळचे पर्यटक मंगळवारी सकाळी साडेआठच्या सुमारास गंगोत्रीकडे रवाना झाले होते. वाटेत ते अडकले असावेत, असा संशय आहे. जळगावच्या १९ पर्यटकांचा संपर्क तुटला या दुर्घटनेचा धसका महाराष्ट्रातही जाणवत असून, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील एक जवान आणि १८ नागरिक ढगफुटीग्रस्त भागात अडकले आहेत. पाचोरा तालुक्यातील जवान सोपान अहिरे हे घटनास्थळी कर्तव्यावर असून, त्यांचाही संपर्क तुटला आहे.

### आपत्ती व्यवस्थापन सज्ज

जळगाव शहरातील तीन जणांशी संपर्क झाला आहे, मात्र उर्वरित १६ जणांशी बुधवारी उशिरापर्यंत संपर्क होऊ शकलेला नाही. संपर्क स्थापित करण्याचे प्रयत्न बचाव यंत्रणांमार्फत सुरू आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली.सततचा पाऊस आणि हवामानाची खराबी यामुळे बचाव कार्य अत्यंत कठीण झाले असून, स्थानिक प्रशासन, एनडीआरएफ, लष्कर व अन्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सज्ज आहेत.

# 'ठरलं तर मग' फेम साक्षी अन् अश्विनची अनोखी जुगलबंदी!

'ठरलं तर मग' मालिका गेल्या काही दिवसांपासून कोर्ट केसच्या निकालामुळे प्रचंड चर्चेत आहे. ही मालिका गेली अडीच वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. याशिवाय टीआरपीमध्ये सुद्धा प्रत्येक आठवड्याला ही मालिका पहिल्या क्रमांकावर असते. यामुळे यामध्ये काम करणारे सगळेच कलाकार आता घराघरांत लोकप्रिय झाले आहेत. अर्जुन-सायलीसह प्रतिमा, पूर्णा आजी, अश्विन, साक्षी, प्रिया, महिपत ही सगळी पात्र साकारणाऱ्या कलाकारांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं आहे. ऑनस्क्रीन या मालिकेत नेहमीच नवनवीन ट्विस्ट येत असतात. सायली-अर्जुन आणि प्रियामधले वाद पाहायला मिळतात. तर, अश्विन सुद्धा साक्षी शिखरेचा या मालिकेत राग करताना दिसतो. पण, ऑफस्क्रीन या सगळ्या कलाकारांमध्ये खूपच छान बॉण्डिंग आहे.साक्षीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री केतकी पालवने नुकताच मालिकेच्या सेटवरून शेअर केलेला एक व्हिडीओ सध्या सर्वत्र चर्चेत आला आहे. यामध्ये चक्क अश्विन म्हणजेच अभिनेता प्रतिक सुरेश आणि केतकी ( साक्षी शिखरे ) एकत्र गाणं गात असल्याचं पाहायला मिळत आहे. प्रतिक सुरेश उत्तम अभिनेता आहेच पण, त्याला गायनाची सुद्धा



प्रचंड आवड आहे. त्याचे गाण्याचे रील्स व्हिडीओ बरेच व्हायरल झाले आहेत. आता प्रतिकने केतकी पालवसह "गोरी तेरी आँखे कहे..." हे लकी अली यांचं सदाबहार गाणं गायलं आहे. हा अल्बम २००१ मध्ये प्रदर्शित झाला होता. पण, आज २४ वर्षांनी सुद्धा या गाण्याची लोकप्रियता घराघरांत कायम आहे. केतकी आणि प्रतिक या दोघांनी देखील हे गाणं तितकंच सुंदररित्या सादर केलं आहे. त्यांचं हे गाणं चाहत्यांच्या सुद्धा पसंतीस उतरलं आहे.दरम्यान, मालिकेत सध्या साक्षी शिखरे जेलमध्ये असल्याचा सीक्वेन्स चालू आहे. त्यामुळे हा व्हिडीओ शूट करताना सुद्धा ती त्याच गेटअपमध्ये असल्याचं पाहायला मिळत आहे. आता खूनाच्या प्रकरणी साक्षी शिखरे किती वर्षे जेलमध्ये राहणार, तिला कोण मदत करणार या सगळ्या गोष्टींचा खुलासा मालिकेच्या आगामी भागांमध्ये करण्यात येईल.

## माझे प्रेक्षकही या पुरस्काराचे मानकरी

नुकत्याच पार पडलेल्या ६० आणि ६१ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी मराठी अभिनेत्री मुक्ता बर्वेला चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. याबद्दल अभिनेत्रीने तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. यावेळी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत मुक्ता बर्वे म्हणाली, "मला खूप छान वाटत आहे. कारण हा विशेष योगदान पुरस्कार आहे आणि चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने या विशेष हा पुरस्कार दिला जातो. महाराष्ट्र शासनाने पदार्पणापासूनच माझं कौतुक केलं आहे. माझ्या 'चकवा' नावाच्या सिनेमासाठी मला पदार्पणाचं पारितोषिक मिळालं होतं. त्यानंतर जवळपास पंचवीस वर्षांनी माझ्या आजवरच्या कामाचं कौतुक होत आहे. त्यामुळे आता एका विशिष्ट टप्प्यावर मी येऊन पोहोचले आहे आणि या टप्प्यावर महाराष्ट्राने माझं कौतुक केलं आहे; याचा आनंद होतो."

## कतरिनाची ही सवय

कतरिना कैफ आणि विकी कौशल बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. बॉलीवूडमधील अनेक इव्हेंट्स आणि पार्टीमध्ये दोघे एकत्र दिसतात. कतरिना जेव्हा घरी असते तेव्हा माझी आई आनंदी असते, असं एका मुलाखतीत विकी म्हणाला होता. अलीकडेच 'द वीक'ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा विकीला विचारण्यात आलं की, त्याला जेवण बनवता येतं का? तेव्हा विकी म्हणाला, "माझ्या संपूर्ण आयुष्यात जेवण करायला मला कधीच जमणार नाही. मी फक्त चहा बनवू शकतो आणि जास्तीत जास्त अंडं फोडू शकतो आणि हेसुद्धा मी कोरोना काळात शिकलो. कारण- तेव्हा मी रात्र रात्र जागून चित्रपट पाहायचो. कारण- त्या वेळेस माझ्याकडे दुसर करायला काहीच नव्हतं. सनी (विकीचा भाऊ) खूप चांगलं जेवण बनवतो. तो माझ्यापेक्षा फक्त एक वर्ष आणि चार महिन्यांनी लहान आहे. त्यामुळे आम्ही मित्रासारखेच राहतो. मी त्याला कोणताही सल्ला देत नाही आणि तो माझ्याकडून कोणताही सल्ला घेत नाही. आम्ही फक्त आमचे अनुभव एकमेकांना शेअर करतो. तो माझ्यापेक्षा खूप समजूतदार आणि शांत आहे."विकीला पुढे जेव्हा त्याच्या घरातील खाद्यपदार्थांच्या निवडीबद्दल विचारण्यात आलं तेव्हा तो म्हणाला, "खाण्याच्या बाबतीत सांगायचं झालं, तर कतरिना माझ्यापेक्षा जास्त शाकाहारी आहे. तिला साधं खायला खूप आवडतं. फार क्वचित ती छोले-भटुरे खाते; पण मी ते आवडीने खातो. जेव्हा कतरिना घरी असते तेव्हा माझ्या आईला खूप बरं वाटतं. ती म्हणते.



## 'असा' असेल 'शिवा' मालिकेचा अंतिम भाग!

जवळपास दीड वर्षे 'झी मराठी' वाहिनीवर अधिराज्य गाजवणारी 'शिवा' मालिका अखेर प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. अलीकडेच यामधील काही कलाकारांनी सोशल मीडियावर भावुक पोस्ट शेअर करत मालिकेच्या शूटिंगचा शेवटचा दिवस पार पडल्याचं जाहीर केलं होतं. आता 'शिवा' मालिकेच्या अंतिम भागाचा प्रोमो 'झी मराठी' वाहिनीकडून इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. 'शिवा' मालिका सर्वांचा निरोप घेताना अखेर सुहासचं खरं रूप अखेर सर्वांसमोर उघड होणार आहे. पण, यासाठी शिवाला मोठी अग्निपरीक्षा द्यावी लागेल. सुहास शिवाला उद्ध्वस्थ करण्यासाठी तिच्या माहेरच्या आणि सासरच्या लोकांवर एकत्र हल्ला करतो. जेणेकरून कोणाच्या मदतीसाठी जायचं हा विचार करून शिवाची कोंडी होईल. कपटी सुहासने शिवाच्या घरी बॉम्ब ठेवलेला असतो. तो तिला म्हणतो, "तुझ्यासमोर फक्त दोन पर्याय आहेत. एकतर माहेरच्यांना वाचवायचं किंवा सासरच्या लोकांना...आता काय करशील?"शिवा त्याला सडेतोड उत्तर देत सांगते, "आज तुला कळेल बाईच्या मनगटात किती ताकद असते. कारण, आज मी एकटी नाहीये. माझ्या मदतीला स्पेशल क्राइम युनिट ऑफिसर तारिणी येतेय." तारिणी म्हणजेच लोकप्रिय अभिनेत्री शिवानी सोनार. ती 'शिवा' मालिकेच्या अखेरच्या भागात खास एन्ट्री घेणार आहे. सुहासला धडा शिकवण्यासाठी 'तारिणी' शिवाला खंबीरपणे साथ देणार आहे.शिवाला पाठिंबा देत तारिणी म्हणते, "तुझ्या कुटुंबाची जबाबदारी फक्त तुझी नाहीये... आमची सुद्धा आहे.



## अभिनेत्री श्वेता मेनन कायदेशीर अडचणीत

९० च्या दशकात अभिनेता सलमान खानबरोबर 'बंधन' या चित्रपटात काम केलेली लोकप्रिय अभिनेत्री श्वेता मेनन एका कायदेशीर अडचणीत अडकली आहे. अभिनेत्री एका कायदेशीर वादात अडकली असून याप्रकरणी तिच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. श्वेता मेननवर 'अश्लीलता' पसरवल्याचा आरोप करण्यात आला असून याबद्दल तिच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ता मार्टिन यांनी श्वेता मेनन यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्टाने स्थानिक पोलिसांना कारवाईचे आदेश दिले. आता अश्लीलता प्रतिबंधक कायदा आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.श्वेता मेननने चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील दृश्यांचा वापर करून आर्थिक फायदा घेतल्याचा आरोप आहे. हा आरोप मार्टिन मेनाचरी नावाच्या सामाजिक कार्यकर्त्याने केला आहे.याप्रकरणी श्वेता मेननवर माहिती तंत्रज्ञान कायदा, कलम 67 (A) अंतर्गत गुन्हा नोंदवला गेला आहे. तक्रारीनुसार, तिच्या या कृतीमुळे तरुणांवर वाईट परिणाम होत आहे आणि ती समाजात चुकीचा संदेश देत आहे. श्वेता फक्त दक्षिणेतील अभिनेत्री नाही, तर हिंदी चित्रपटांमध्येही तिने काम केलं आहे. 'रथिनिर्वेदम' आणि 'साल्ट एन पेपर' यांसारख्या मल्याळम चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे, तर हिंदीत सलमान खानच्या 'बंधन' आणि 'अशोका' यांसारख्या चित्रपटांमध्येही ती झळकली आहे.तिने एकूण ३० हिंदी चित्रपटात काम केलं असल्याची माहिती आहे. ती शेवटची 'बादल' या चित्रपटात झळकली होती. दरम्यान, श्वेताने तिच्यावर झालेल्या अश्लीलतेच्या आरोपांबद्दल अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे आता याप्रकरणी श्वेता मेनन काय प्रतिक्रिया देणार?

## ओव्हल कसोटी

## शेवटच्या दिवशी सिराज-गिलमध्ये कशावरून बिनसलं?

# गिल-सिराजची योजना काय होती?

## ध्रुवपर्यंत संदेश वेळेत पोहोचवू शकलो नाही

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर गेला असून उभय देशांमध्ये खेळवण्यात आलेली पाच कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली आहे. मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने इंग्लंडचा सहा धावांनी पराभव केला. या सामन्यात शेवटच्या दिवशी इंग्लंडला विजयासाठी ३५ धावांची तर भारताला चार विकेट्सची आवश्यकता होती. पाचव्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर भारताने इंग्लंडचे तीन गडी झटपट बाद केले. मात्र, त्यानंतर दुखापतग्रस्त ख्रिस व्होक्स मैदानात उतरला. व्होक्स एका हाताने फलंदाजी करत होता तर गट ॲटकिन्सन त्याला स्ट्राइकपासून दूर ठेवत होता.**



दरम्यान, भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल व जलदगती गोलंदाज मोहम्मद सिराज या दोघांनी मिळून गट ॲटकिन्सनला बाद करण्याची योजना आखली होती. मात्र, त्यात त्यांना यश मिळत नव्हतं. तेव्हा सिराजने भर मैदानातच गिलवर नाराजी व्यक्त केली होती. त्यावेळी मैदानात काय घडलं आणि भारतीय संघाची नेमकी योजना काय होती याबाबत सामना संपल्यानंतर भारतीय कर्णधार शुभमन गिलने माहिती दिली आहे.ॲटकिन्सन व व्होक्स मैदानावर उभे होते. ॲटकिन्सन प्रत्येक षटकाच्या शेवटच्या चेंडूवर एक धाव घेऊन स्ट्राइक स्वतःकडे ठेवत होता. जेणेकरून दुखापतग्रस्त व्होक्सला फलंदाजी करावी लागू नये. दरम्यान, ८४ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर गिल व सिराजने ठरवलं की वाइड यॉर्कर चेंडू टाकायचा. त्यामुळे ॲटकिन्सन षटकार लगावू शकणार नाही, तसेच एकेरी धाव घेणं देखील त्याला अवघड जाईल. तसेच त्याने एकेरी धाव घेण्याचा प्रयत्न केलाच तर दोघांपैकी कोणत्याही फलंदाजाला धावबाद करता येईल.गिल म्हणाला, "शेवटचा चेंडू फेकण्याआधी आम्ही यष्टीरक्षक ध्रुव जुरेलला सांगणार होतो की तू एका हातातील ग्लोव्ह काढून ठेव जेणेकरून व्होक्सला धावबाद करण्याची संधी मिळाली तर तू तुझी कामगिरी सहज फत्ते करू शकशील. परंतु, मी ध्रुवपर्यंत हा संदेश वेळेत पोहोचवू शकलो नाही. सिराजने मला सांगितलं होतं की तू ध्रुवला ग्लोव्ह काढून ठेवायला सांग. परंतु, मी ध्रुवला सांगेपर्यंत ॲटकिन्सनने चेंडू टोलवला होता, ॲटकिन्सन व व्होक्स धावू लागले होते. त्यामुळे ध्रुवला ग्लोव्ह काढून व्होक्सला धावबाद करण्याची संधी मिळाली नाही. त्यानंतर सिराज मला म्हणाला, 'तू ध्रुवला सांगितलं का नाहीस?' त्यानंतर सिराजने तो विषय सोडून दिला आणि तो क्षेत्ररक्षण करायला सीमारेषेजवळ गेला."

### मैदानात नेमकं काय घडलं?

सिराज मला म्हणाला, 'तू ध्रुवला सांगितलं का नाहीस?' त्यानंतर सिराजने तो विषय सोडून दिला आणि तो क्षेत्ररक्षण करायला सीमारेषेजवळ गेला."भारतीय क्रिकेट संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर गेला असून उभय देशांमध्ये खेळवण्यात आलेली पाच कसोटी सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली आहे. मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने इंग्लंडचा सहा धावांनी पराभव केला.

तो विषय सोडून दिला आणि तो क्षेत्ररक्षण करायला सीमारेषेजवळ गेला."दरम्यान, भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल व जलदगती गोलंदाज मोहम्मद सिराज या दोघांनी मिळून गट ॲटकिन्सनला बाद करण्याची योजना आखली होती. मात्र, त्यात त्यांना यश मिळत नव्हतं. तेव्हा सिराजने भर मैदानातच गिलवर नाराजी व्यक्त केली होती. त्यावेळी मैदानात काय घडलं आणि भारतीय संघाची नेमकी योजना काय होती याबाबत सामना संपल्यानंतर भारतीय कर्णधार शुभमन गिलने माहिती दिली आहे.ॲटकिन्सन व व्होक्स मैदानावर उभे होते. ॲटकिन्सन प्रत्येक षटकाच्या शेवटच्या चेंडूवर एक धाव घेऊन स्ट्राइक स्वतःकडे ठेवत होता. जेणेकरून दुखापतग्रस्त व्होक्सला फलंदाजी करावी लागू नये. दरम्यान, ८४ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर गिल व सिराजने ठरवलं की वाइड यॉर्कर चेंडू टाकायचा. त्यामुळे ॲटकिन्सन षटकार लगावू शकणार नाही, तसेच एकेरी धाव घेणं देखील त्याला अवघड जाईल. तसेच त्याने एकेरी धाव घेण्याचा प्रयत्न केलाच तर दोघांपैकी कोणत्याही फलंदाजाला धावबाद करता येईल.गिल म्हणाला, "शेवटचा चेंडू फेकण्याआधी आम्ही यष्टीरक्षक ध्रुव जुरेलला सांगणार होतो की तू एका हातातील ग्लोव्ह काढून ठेव जेणेकरून व्होक्सला धावबाद करण्याची संधी मिळाली तर तू तुझी कामगिरी सहज फत्ते करू शकशील. परंतु, मी ध्रुवपर्यंत हा संदेश वेळेत पोहोचवू शकलो नाही. सिराजने मला सांगितलं होतं की तू ध्रुवला ग्लोव्ह काढून ठेवायला सांग. परंतु, मी ध्रुवला सांगेपर्यंत ॲटकिन्सनने चेंडू टोलवला होता, ॲटकिन्सन व व्होक्स धावू लागले होते.

## इंग्लंडच्या गोलंदाजाना ताजेतवाणे का ठेवावे?

# स्टोक्स-जडेजामधील हस्तांदोलन वादावर तेंडुलकरची प्रतिक्रिया

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची अँडरसन-तेंडुलकर कसोटी मालिका अनेक कारणांसाठी चर्चेत राहिली. पाचव्या कसोटी सामन्यात भारताने अवघ्या सहा धावांनी इंग्लंडचा पराभव करत मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली. या मालिकेत अनेक विक्रम मोडीत निघाले, काही नवे विक्रम प्रस्थापित झाले. खेळाबरोबच इतर अनेक प्रसंग मालिकेत गाजले. मँचेस्टरमधील चौथ्या कसोटीत हस्तांदोलन वाद उफाळून आला.**



यावर आता भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने मोठी प्रतिक्रिया दिली आहे. चौथ्या कसोटीत पाचव्या दिवशी भारताचा फलंदाज रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी बहारदार खेळ करत कसोटी सामना वाचवला. सामन्याचा निकाल लागणार नसल्याचे लक्षात आल्यानंतर इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने फलंदाजी रोखत सामना संपविण्याची सूचना केली. मात्र रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरने ही मागणी धुडकावून लावली. यावर क्रिकेटजगतातून अनेक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. बेन स्टोक्सने खिलाडूवृत्ती दाखवली नसल्याचाही आरोप करण्यात आला.बेन स्टोक्सची सूचना धुडकावून फलंदाजी करत राहण्याच्या भारताच्या निर्णयाला भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरनेही आता पाठिंबा दिला आहे. रेडिट या सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये सचिन तेंडुलकरने म्हटले की, इंग्लंडच्या गोलंदाज आणि इतर खेळाडूंना विश्रांती मिळावी म्हणून भारताच्या फलंदाजांनी हात मिळवून खेळ का संपवावा? जर इंग्लंडला हॅरी ब्रुकला गोलंदाजी द्यायची होती तर हा स्टोक्सचा निर्णय होता. ती भारताची अडचण नव्हती.

### 'ती भारताची अडचण नाही'

पाचव्या कसोटीत घडलेल्या या घटनेबाबत गिल म्हणाला, "हो, त्याने मला सांगितलं होतं की ध्रुवला सांग, हातातले ग्लोव्हज काढून ठेव, जेणेकरून रनआऊटची संधी आल्यास सोपं जाईल. तो रनआऊट हुकलेला पाहता सिराज संतापला आणि तो बोलला की, तू त्याला ग्लोव्हज काढायला सांगितलं नाही का? गिलचं बोलून होताच दोघंही पत्रकार परिषदेत हसू लागले. प

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। गुरुवार ।
। दि. 7 ऑगस्ट 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
**Saswad, Pune - 412301**
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



**15k+** Students Placed

**52 LPA** Highest Package

**50,000+** Alumni

**1000+** Empanelled Recruiters

**150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

Jendamark | wipro | NTT Data | virtusa | B&R | Emcure | KNORR-BREMSE | NuLife | Evolving X | CitiusTech | SHL | WorldLine
McKinley Rice | bvc Humanity Ahead | Technouniq | RPG | Constrologix | NASSCOM Foundation | INDOVANCE | Tech Mahindra | DataTech Labs | EMERSON | newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

DESIGNED BY SHIVPRASAD S PATIL

REGISTER HERE

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल सादर!

## महापालिकेच्या 2024-25 मधील पर्यावरण अहवालाचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते प्रकाशन

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबात विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



“ पिंपरी चिंचवड शहराचा पर्यावरणीय विकास हे केवळ यंत्रणांचे यश नसून, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून मिळालेले यश आहे. पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल हे शहराच्या पर्यावरणविषयक प्रगतीचा आरसाच आहे. भविष्यातील निर्णयांसाठी मार्गदर्शक म्हणून हा अहवाल महत्त्वपूर्ण ठरू शकेल.
**- शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

“ पर्यावरण सद्यस्थिती अहवालामध्ये आम्ही केवळ आकडेवारी सादर केलेली नाही, तर शहराच्या पर्यावरणासंबंधीच्या प्रत्येक घटकाचे कार्यपद्धतीनुसार दस्तऐवजीकरण केले आहे. सातत्याने सुधारणा करणे आणि विज्ञानाधिष्ठित निर्णय घेणे हे आमचे उद्दिष्ट राहिले आहे. पिंपरी चिंचवडचा हा अहवाल इतर शहरांसाठीही दिशादर्शक ठरेल, असा विश्वास वाटतो.
**- संजय कुलकर्णी,** मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड शहराच्या पर्यावरण क्षेत्रातील स्थितीचा सखोल मागोवा घेणारा “पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल सन २०२४-२५” चे आज पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते स्थायी समितीच्या बैठकीत प्रकाशन करण्यात आले.

या अहवालात मागील तीन वर्षांचा तुलनात्मक आढावा घेत शहरातील पर्यावरणविषयक स्थितीचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. क्षेत्र आणि लोकसंख्या, हवामानातील बदल, पर्जन्यमान, पाणीपुरवठा, नदी-नाले-तलावांची सद्यस्थिती, जलनि:स्सारण योजना व मैलाशुद्धीकरण प्रकल्प, हवेतील व ध्वनी प्रदूषणाचे स्तर, मृदा गुणवत्ता, घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जा वापर, रस्ते आणि वाहतूक व्यवस्था, स्मार्ट सिटी प्रकल्प, शिक्षण, वैद्यकीय सेवा, उद्याने, उद्योगधंदे, आपत्ती व्यवस्थापन, शहर नुतनीकरण योजना आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, पिंपरी चिंचवड शहराने जलनि:स्सारण व्यवस्थापनाच्या बाबतीत १०० टक्के निकष पूर्ण करत सलग दुसऱ्यांदा ‘वॉटर प्लस’ मानांकन प्राप्त केले आहे. यामध्ये घरपातळीवरील घनकचरा व्यवस्थापनातून सुक्या कचऱ्यापासून उभारलेला वेस्ट टू एनर्जी प्रकल्प, राडारोड्यावर प्रक्रिया करणारा सी अँड डी प्लांट, एमआरएफ युनिट्स, ओला-सुका कचरा ट्रान्स्फर स्टेशन, मोशीतील बायो मेडिकल वेस्ट प्लांट, कंपोस्टिंग युनिट्स, पुनर्वापर प्रकल्प, बायोगॅस युनिट्स आणि विकेंद्रित प्रक्रिया केंद्रे यांचे विशेष योगदान राहिले आहे. या सर्व कार्यवाहीमुळे शहराने सात-स्टार गार्बेज फ्री सिटीचे मानांकनही यशस्वीरित्या राखले आहे.

मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या या अहवालासाठी कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बन्सल, कार्यकारी अभियंता सोहन निकम, चीफ केमिस्ट उमा भोगे, कनिष्ठ अभियंता प्रतीक सूर्यवंशी आणि पर्यावरण विभागातील इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

# विद्यार्थ्यांच्या कौशल्याला मिळाले हक्काचे व्यासपीठ

## शिक्षण विश्व: फ्युजन आर्क क्लबच्या वतीने स्टॅम्प डिझाईन स्पर्धेचे आयोजन

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट कॉमर्स सायन्स महाविद्यालय, आळंदी येथे दिनांक 26 जुलै 2025 रोजी फ्युजन आर्क क्लबच्या वतीने संयुक्त राष्ट्राच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील टपाल तिकिटे डिझाइन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.**




या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. सुधांशू सक्सेना, प्राध्यापक (प्रॅक्टिस), एमआयटी एसीएस कॉलेज, आळंदी-पुणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या सर्जनशील कामाचे मूल्यमापन केले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. बी. बी. वाफारे, असोसिएट डीन डॉ. सुनील महाजन, विभागप्रमुख बरीन शेख, डॉ. पद्मावती उंदाले आणि क्लब समन्वयक निकिता दौरे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

महाविद्यालयाच्या विविध विभागांमधून एकूण 16 विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्साहपूर्वक सहभाग घेऊन आपापल्या क्रिएटिव्ह स्टॅम्प डिझाईन्स सादर केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निकिता देवरे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. सिद्धी वाघचौडे यांनी केले. वर्कशॉप यशस्वी करण्यासाठी डेप्युटी डायरेक्टर्स, सर्व डीन, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकउत्तर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# लोणावळ्यात अनधिकृत बांधकामांचा स्फोट!

## गुन्हेगारीत वाढ; सत्ताधारी राष्ट्रवादीच्या आमदारांचा गंभीर आरोप

। लोणावळा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पर्यटननगरी म्हणून ओळख असलेल्या लोणावळ्यामध्ये दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांचा आणि गुन्हेगारी घटनांचा सुळसुळाट वाढत असून, त्यामुळे शहराचा सामाजिक आणि कायदेशीर ढाचा ढासळत चालला आहे. या पार्श्वभूमीवर मावळचे आमदार सुनील शेळके यांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत थेट इशारा दिला आहे.**



“लोणावळा व मावळ तालुक्याचे नाव बदनाम होणार नाही, याची खबरदारी घ्या. अन्यथा यंत्रणांवर कारवाईचा बडगा उगारावा लागेल,” अशी आक्रमक भूमिका आमदार शेळके यांनी घेतली आहे. शहरात परवाना न घेता उभारली जात असलेली रिसॉर्ट्स, हॉटेल्स, बंगल्यांची संख्या झपाट्याने वाढत असून, त्यातून नशा, जुगार, सेक्स रॅकेट्स यांसारख्या गैरकृत्यांना उत्तेजन मिळत असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

स्थानिक अधिकाऱ्यांची ढिसाळ भूमिका, राजकीय हस्तक्षेप आणि पोलिस यंत्रणेची दुर्लक्ष वृत्ती यामुळे गुन्हेगारांना खुलेआम मोकळे रान मिळत असल्याचा आरोप करत, त्यांनी प्रशासनाला झणझणीत फैलावर घेतले. “शासनाच्या नियमांची पायमल्ली करणाऱ्यांना पाठबळ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई झाली पाहिजे,” अशी मागणी त्यांनी केली.

या परिस्थितीमुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक रहिवाशांचे जगणेही कठीण झाले आहे. आमदार शेळके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "मावळची प्रतिमा डागाळू नये यासाठी आता कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे. जर प्रशासन झोपेत असेल, तर ती झोप आम्ही उडवू."

या घडामोडींमुळे लोणावळ्यात एकच खळबळ उडाली असून, येत्या काळात या मुद्द्यावर मोठा राजकीय व सामाजिक संघर्ष होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही, तर जनतेचा रोष उफाळून येईल, हे निश्चित आहे असे देखील आमदार शेळके यांनी म्हटले आहे.

